सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३२५ | मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com



**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १५०८०० |
| २२ Ct सोने ९१.६०% | ₹ १३९८०० |
| १८ Ct सोने ७५.००% | ₹ ११६४०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २३७०/- |

भाव प्रती १० ग्राम

आजचे
**अभीष्टचिंतन**





प्रा. डॉ. प्रभाकर सोनवणे
अमळनेर



श्री. संजय विसपुते
अमळनेर / नाशिक



श्री. अश्विन जैन
अमळनेर



श्री. दीपक बारी
फोटोग्राफर



चि. सर्वेश पाटील
अमळनेर


# श्रावण मासानिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात रुद्र महाभिषेक

## नगरसेवक महेश देशमुख सपत्नीक पूजेचे विशेष मानकरी; भाविकांची मोठी उपस्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रावणमासाच्या पवित्र पर्वानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलिक श्री मंगळग्रह मंदिरात आज सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी भक्तिमय वातावरणात रुद्र महाभिषेक झाला. नगरसेवक महेश देशमुख हे सपत्नीक रुद्राभिषेक पूजेचे विशेष मानकरी होते. त्यांनी मंदिरातील श्री मंगलेश्वर महादेवांच्या पिंडीवर विधिवत रुद्र महाभिषेकासह पूजा-अर्चा व बिल्वार्चना केली. भगवान शिवजींच्या उपासनेसाठी विशेष पवित्र मानल्या जाणाऱ्या श्रावणमासात झालेल्या या धार्मिक विधीमुळे मंदिर परिसरात चैतन्य आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी श्रावणमासात रुद्र महाभिषेकाचे आयोजन करण्यात येते. यंदाही पारंपरिक धार्मिक विधींचे पालन करीत रुद्र महाभिषेक झाला. शिवलिंगावर जल, दुग्ध आदींच्या अभिषेकासह मंत्रोच्चार करण्यात आले. यावेळी भाविकांनी भगवान शिवजींचे दर्शन घेत पूजा-अर्चा केली.

हिंदू धार्मिक परंपरेत श्रावणमासाला विशेष महत्त्व आहे. या महिन्यात भगवान शिवजींची उपासना, रुद्राभिषेक, महामृत्युंजय मंत्रजप आणि शिवनामस्मरण करण्याची प्रथा आहे. ‘रुद्र’ हे भगवान शिवजींचे तेजस्वी व उग्र स्वरूप मानले जाते. रुद्र महाभिषेकाच्या माध्यमातून शिवतत्त्वाचे स्मरण, अंतःकरणाची शुद्धी आणि आध्यात्मिक समाधान प्राप्त होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे.

रुद्राभिषेकानंतर झालेल्या महाआरतीने सोहळ्याची सांगता झाली. याप्रसंगी झालेला घंटानाद, शंखनाद आणि मंत्रोच्चारांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला. उपस्थित भाविकांनी ‘हर हर महादेव’चा जयघोष करीत आरतीत सहभाग घेतला. महाआरतीवेळी संपूर्ण परिसरात भक्तीमय आणि प्रसन्न वातावरण अनुभवायला मिळाले. मंदिराचे पुरोहित शुभम वैष्णव व परशुराम शर्मा यांनी रुद्र महाभिषेकाचे पौरोहित्य केले. उमेश पाठक यांनी त्यांना सहकार्य केले. या धार्मिक सोहळ्यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर यांच्यासह मंगल सेवेकरी, भाविक आणि मंदिरातील सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*अमळनेर : श्रावणमासाच्या पवित्र पर्वानिमित्त येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलिक श्री मंगळग्रह मंदिरात सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी भक्तिमय वातावरणात रुद्र महाभिषेक झाला. यावेळी सपत्नीक रुद्र महाभिषेकासह पूजा-अर्चा करताना विशेष मानकरी नगरसेवक महेश देशमुख. (छायाचित्र : नितेश बारी)*

## श्री मंगळग्रह मंदिरात आज श्री सत्यनाराण महापूजा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : श्रावणमासाच्या पवित्र पर्वानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलिक श्री मंगळग्रह मंदिरात मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली आहे. महापूजेचे विशेष मानकरी प्रा. श्री. भरतसिंग परदेशी व सौ. कल्पनाताई परदेशी या दाम्पत्याच्या हस्ते सकाळी साडेनऊच्या सुमारास या महापूजेची मंत्रोपचारांसह विधिवत सुरूवात होईल. श्रावणमासातील भगवान विष्णूंच्या सत्यनारायण स्वरूपाची महापूजा करणे अत्यंत पवित्र व फलदायी मानले जाते. या काळात वातावरण पूर्णपणे सात्त्विक असते. त्यामुळे या पवित्र महापूजेवेळी शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासह तीर्थप्रसादासाठी सकाळी ९ वाजेपासून रात्री १० वाजेपर्यंत यावे, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेच्या विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.







## चोपडा रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

# स्मशानभूमी ते श्री मंगळग्रह मंदिर मार्ग धोकादायक

- पावसात खड्ड्यांचे चिखलात रूपांतर; वाहनधारकांची कसरत
- रात्री अपघातांचा धोका; नाल्याला कठडे नसल्याने परिस्थिती गंभीर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील चोपडा रस्त्यावरील स्मशानभूमीपासून श्री मंगळग्रह मंदिरापर्यंतच्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. खड्डे, चिखल आणि उखडलेल्या रस्त्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. शहरातील हा महत्त्वाचा मुख्य मार्ग असून पुढे अनेक गावांना जोडणाऱ्या या रस्त्यावर दररोज एसटी बस, अवजड वाहने व चारचाकी, दुचाकींसारखी शेकडो वाहने धावतात. मात्र, रस्त्याच्या दुरवस्थेकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

श्री मंगळग्रह मंदिर हे अमळनेरचे प्रमुख धार्मिक व पर्यटनस्थळ असल्याने जिल्ह्यासह परराज्यांतूनही भाविकांची मोठ्या संख्येने येथे ये-जा असते. त्यातच सध्या श्रावण महिना सुरू असल्याने पुढे श्री वर्णेश्वर महादेव मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांचीही मोठी गर्दी वाढली आहे. अशा परिस्थितीत रस्त्याची अवस्था दिवसभरात वावरणाऱ्या वाहनांमुळे त्यांच्या उडणाऱ्या धुळीचा त्रास दुचाकीचालकास व पायी चालणाऱ्यांना मोठ्या प्रमाणात होतो. रस्त्याची दुरवस्था भाविकांसह स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

**डागडुजी तात्पुरतीच; पाऊस पडताच ‘जैसे थे’**

नागरिकांकडून ओरड झाल्यानंतर काही वेळा खड्ड्यांमध्ये मातीमिश्रित मुरुम टाकून ते बुजविण्याचा तात्पुरता प्रयत्न केला जातो. मात्र, पाऊस पडताच हा मुरुम चिखलात रूपांतरीत होतो. त्यामुळे वाहनांची चाके घसरून अपघाताची शक्यता वाढते. खड्ड्यांची खोली आणि त्यांचा अंदाज रात्री येत नसल्याने दुचाकीस्वार तसेच चारचाकी वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते.

**अपघातांची टांगती तलवार**

रस्त्याच्या काही भागालगत असलेल्या नाल्याला सुरक्षात्मक कठडे नसल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. रात्रीच्या अंधारात खड्डे आणि नाला लक्षात न आल्यास वाहन थेट नाल्यात जाण्याचा धोका आहे. या मार्गावर छोटे-मोठे अपघात घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे असून, मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**रस्ता कायमस्वरूपी दुरुस्तीची मागणी**

मुख्य रस्ता असूनही वारंवार तात्पुरती डागडुजी करण्याऐवजी या मार्गाची कायमस्वरूपी दर्जेदार दुरुस्ती करण्यात यावी. खड्डे बुजवून रस्ता समतल करावा तसेच नाल्यालगत संरक्षक कठडे उभारावेत, अशी मागणी वाहनधारक व नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने आणखी किती अपघातांची वाट पाहायची? असा संतप्त प्रश्न नागरिक उपस्थित करीत असून, संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून ठोस कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> ***“चोपडा रस्त्यावरील स्मशानभूमीलगत काही दिवसांपूर्वी माती व मुरुमाच्या सहाय्याने खड्डे भरण्यात आले होते. तसेच दोन-चार दिवस पावसाचे वातावरण निवळल्यानंतर त्या ठिकाणी डांबराच्या सहाय्याने खड्डे भरण्याबाबत मी कंत्राटदाराला सांगतो. नाल्यावरील उघड्या व धोकादायक सळयांचीही दुरुस्ती करण्यात येईल.***
> ***– मयूर भदाणे, अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर.***

‘व्हॉईस ऑफ मीडिया’चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष

# डॉ. डिगंबर महाले यांचा बुधवारी होणार सन्मान


## अमळनेरमधील विविध सामाजिक व सांस्कृतिक संघटनांतर्फे भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आंतरराष्ट्रीय स्तरासह ७४ देशांमध्ये कार्यरत असलेल्या ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ या पत्रकार संघटनेच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी नुकतीच येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. डिगंबर महाले यांची निवड झाली. त्याबद्दल शहरातील विविध सामाजिक व सांस्कृतिक व पुरोगामी संघटनांतर्फे बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता पिंपळे रोडवरील विठ्ठलनगरातील अभ्यासिका अर्थात प्रा. अशोक पवार यांच्या निवासस्थानी भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे.

पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. महाले यांची ‘व्हॉईस ऑफ मीडिया’च्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी निवड झाल्याने अमळनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. या निवडीबद्दल विविध सामाजिक, सांस्कृतिक व पुरोगामी संघटनांतर्फे त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले जाणार आहे. या सत्कार सोहळ्याचे आयोजक युवा कल्याण प्रतिष्ठान, मराठा सेवा संघ, बहुजन समाज पार्टी, मौर्य क्रांती संघ महाराष्ट्र राज्य, बहुजन क्रांती मोर्चा, राष्ट्र सेवा दल, महिला पतंजली योग समिती महाराष्ट्र पूर्व, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, राष्ट्रीय कला मंच, पुरोगामी क्रांती दल तसेच अल्लामा फजले हक खैराबादी स्टडी सेंटर ॲण्ड पब्लिक लायब्ररी, अमळनेर हे आहेत. या कार्यक्रमास शहरातील सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील सर्व मान्यवरांसह नागरिक, हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून डॉ. महाले यांना शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


**अभीष्टचिंतन**



प्रा. डॉ.
**प्रभाकर सोनवणे**
निवृत्त प्राध्यापक : प्रताप महाविद्यालय
एम.एस्सी. (भौतिकशास्त्र) पीएच.डी.

यांना वाढदिवसाच्या अनेकोत्तम ‘मंगलमय’ शुभेच्छा...!

* शुभेच्छुक *
समस्त मित्र परिवार व हितचिंतक, अमळनेर.


# हॉटेल पायलच्या गुदामाला आग; लाखोंचे नुकसान

## अग्नीशमन बंब वेळेत पोहोचल्याने आजूबाजूची गुदामे, दुकाने वाचली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील बाजारपेठेतील हॉटेल पायलच्या गुदामाला आग लागून सुमारे वीस ते पंचवीस लाख रुपयांचे नुकसान झाले. ही घटना रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी सकाळी सातच्या सुमारास घडली. मात्र, वेळीच अग्नीशमन बंब पोहोचल्याने आणखी नुकसान होण्यापासून ते वाचले. सदर गुदाम नगरसेवक भरतकुमार ललवाणी यांचे आहे. हॉटेल पायलच्या या गुदामाला आग लागल्याचे सिंधी समाजाचे गुरू महाराजांना दिसले. त्यांनी तत्काळ मॅनेजर व मालक भरतकुमार ललवाणी यांना कळविले. त्यांनी पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना कळविताच अग्नीशमन विभागाचे बंब तत्काळ घटनास्थळी पोहोचले. अग्नीशमन विभागाचे

**पान २ वर**



*अमळनेर : येथील हॉटेल पायलच्या गुदामाला रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी सकाळी आग लागल्यानंतर ती विझविताना पालिकेच्या अग्नीशमन विभागाचे कर्मचारी.*


**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# नियमन हवे; जाच नको

परकीय योगदान (नियमन) सुधारणा विधेयक २०२६ (एफसीआरए) संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय समंजसपणाचे निदर्शक आहे. विरोधी पक्षांचा तीव्र विरोध, मित्रपक्षांसह काही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी समोर आणलेल्या त्रुटी आणि अमेरिका-युरोपीय संघाने व्यक्त केलेल्या चिंता, या पार्श्वभूमीवर या विधेयकावर सर्वांगीण साधकबाधक चर्चा होऊन एकमत घडावे, ही सरकारची भूमिका स्वागतार्ह आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनातील गदारोळात सभागृहाचे कामकाज होतच नव्हते. हे विधेयकसुद्धा पूर्णपणे मागे घ्यावे, अशी विरोधी पक्षांची मागणी होती. मात्र, पुरेसे बहुमत असतानाही ते 'जेपीसी'कडे पाठवून सरकारने सध्यापुरता सुवर्णमध्य काढलेला दिसतो. विविध सेवाकार्यांसाठी परदेशातून येणारा निधी योग्य मार्गाने खर्च होतो की नाही आणि त्यातून देशविघातक कारवायांना बळ मिळत नाही ना, हे पाहण्यासह त्याला कायद्याची बंधने घालण्याच्या उद्देशाने या सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या. मात्र, यातील काही तरतुदींबाबत विविध समाजघटकांना गंभीर शंका आहेत. विरोधी पक्षांनी हे विधेयक 'अल्पसंख्याकविरोधी' असल्याचा आरोप केला होता; तसेच दक्षिण भारत आणि ईशान्येकडील काही राज्यांमधूनही या तरतुदींना विरोध होत आहे.

मानवकल्याणासाठी उभारलेल्या सेवाकार्यांना देश-विदेशातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होतो. गेल्या वर्षी देशातील हजारो संस्थांना सुमारे २३ हजार कोटी रुपयांचा निधी मिळाला असून, त्यातून शिक्षण, आरोग्य, सामाजिक कल्याण, नैसर्गिक आपत्तीमध्ये साह्य, पर्यावरण, महिला-बालकल्याण किंवा आदिवासी विकास या क्षेत्रांमध्ये ही कामे सुरू आहेत. अशा निधीचे योग्य नियमन व्हावे, या उद्देशाने सन १९७६ मध्ये आणीबाणीच्या काळात 'एफसीआरए' कायदा लागू झाला. त्यामध्ये दुरुस्ती करून स्वयंसेवी संस्थांची नोंदणी, त्यांच्या प्रशासकीय खर्चावर मर्यादा आणि निधीचे लेखापरीक्षण अशा तरतुदी वेळोवेळी लागू करण्यात आल्या आहेत. मात्र, या परदेशी निधीतून देशविरोधी कारवायांना पैसे पुरवले जातात, कुडनकुलम अणुप्रकल्पासारख्या विकासकामांना विरोध करणाऱ्या आंदोलनांना बळ देऊन विकासात बाधा आणली जाते; तसेच निवडणुकीवर प्रभाव टाकण्यासाठी या निधीचा वापर होतो आणि काही संस्थांकडून धर्मांतरासारखी कामे या निधीतून केली जातात, असे आरोप करण्यात येतात. काही स्वयंसेवी संस्थांमध्ये मूळ उद्देशाऐवजी प्रशासकीय खर्चाच्या नावाखाली त्या निधीची उधळपट्टी होते, अशाही तक्रारी होत्या. त्या पार्श्वभूमीवर नवे विधेयक आणण्यात आले. मात्र, यातील काही तरतुदी अस्पष्ट आणि नोकरशाहीला अवाजवी अधिकार देणाऱ्या असल्याची टीका करण्यात येते. विशेषत: परवाना नूतनीकरण लांबण्यासारख्या क्षुल्लक-तांत्रिक मुद्द्यांवर संबंधित संस्थेची आधी उभारलेली मालमत्ताही थेट सरकारच्या ताब्यात देण्यासारख्या मुद्द्यांवर अधिक विरोध आहे.

'ख्रिस्ती मिशनरींकडून चालवण्यात येणाऱ्या शाळा-महाविद्यालये किंवा रुग्णालये ताब्यात घेण्याचा हा डाव आहे,' अशी टीका सुरू झाली. त्याबरोबरच नव्या मसुद्यात 'राष्ट्रीय हितास हानिकारक' किंवा 'राजकीय उद्देश' हे उल्लेख संदिग्ध असून, नेमकी व्याख्या न केल्यास 'इन्स्पेक्टर राज' सुरू होण्याची भीतीही व्यक्त होत आहे. अमेरिकेच्या एका खासदाराने 'हा ख्रिस्ती धर्मावरील हल्ला आहे,' असे सांगून द्विपक्षीय संबंधांवरही परिणाम होऊ शकतो, अशी टीका केली; तर युरोपीय संघानेही हे मानवी अधिकारांचे उल्लंघन असल्याचे मत मांडले. अर्थात, भारताने 'ही पूर्णपणे अंतर्गत आणि संसदेच्या अधिकारक्षेत्रातील बाब आहे,' असे ठणकावले. या विधेयकाबाबत राजकीय पक्षांनी मांडलेल्या भूमिकांमागे आपापली मतपेढी सुरक्षित ठेवण्याचाही सुप्त-उघड हेतू आहेच. मात्र, दिल्लीसह महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि ईशान्येकडील बहुतांश राज्यांमध्ये परदेशी निधीतून अनेक सेवाकार्ये सुरू आहेत. या विधेयकातील तरतुदींमुळे त्या कार्यात अडसर निर्माण होऊ नये, ही तेथील सरकारांची चिंता रास्त आहे. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वभौमत्व यांचे रक्षण प्राधान्याने झालेच पाहिजे; मात्र या कार्यांचे लाभार्थी असलेल्या वंचित समूहांना त्यांचा फटका बसू नये आणि नागरी समाजाची स्वायत्तताही अबाधित राहावी, यासाठी स्पष्ट तरतुदी करणे आणि अवाजवी दमन टाळण्यासाठी सर्व घटकांशी चर्चा करून पारदर्शक कायदा आणणेच योग्य ठरेल.

### हॉटेल पायलच्या गुदामाला आग; लाखोंचे नुकसान

पान १ वरून : प्रमुख गणेश गोसावी, दिनेश बिऱ्हाडे, फारुख शेख, मच्छिंद्र चौधरी, भिका संदानशीव, वसीम पठाण यांनी घटनास्थळी जाऊन आग आटोक्यात आणली. त्यामुळे आजूबाजूची गुदामे व दुकाने यांचा आगीपासून बचाव होऊन पुढील अनर्थ टळला. आगीत मद्याच्या सुमारे तीन हजार प्लास्टिक बाटल्या व त्यातील मद्य जळाल्याने प्राथमिक अंदाजानुसार पंचवीस ते लाख लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. आगीचे नेमके कारण समजू शकलेले नाही. मात्र, सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत.

## कोहिनूरवर अनेक देशांचा दावा; पण त्याची खरी किंमत किती?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगातील सर्वांत प्रसिद्ध हिऱ्यांपैकी एक असलेल्या कोहिनूरची किंमत आजही चर्चेचा विषय आहे.

**सुरूवातीचे वजन :** सुरूवातीला या हिऱ्याचे वजन सुमारे १८६ कॅरेट असल्याचे मानले जाते.

**आताचे वजन :** हिऱ्याला अधिक आकर्षक बनविण्यासाठी त्याला पैलू पाडण्यात आले. त्यानंतर त्याचे वजन १०५.६ कॅरेट इतके राहिले.

### आजची किंमत किती?

कोहिनूरची अधिकृत बाजारभावानुसार किंमत कधीच निश्चित करण्यात आलेली नाही.

**तज्ज्ञ :** अनेक तज्ज्ञांच्या मते आजच्या घडीला या हिऱ्याची किंमत अब्जावधी रुपयांपर्यंत असू शकते.

**सांस्कृतिक वारसा :** कोहिनूर हा केवळ मौल्यवान हिराच नाही, तर ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसाही मानला जातो.

**हक्क :** कोहिनूर हिरा सध्या ब्रिटनच्या शाही संग्रहाचा भाग आहे. त्यावर अनेक देशांनी या हिऱ्यावर हक्कही सांगितला आहे.

**चर्चेतल्या हिऱ्यांपैकी एक :** कोहिनूरची खरी किंमत पैशांत मोजणे योग्य नाही. इतिहास, वारसा आणि दुर्मिळतेमुळे तो आजही जगातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या हिऱ्यांपैकी एक आहे.

# अंधजन कल्याण मंडळाची चॅरिटी संगीत मैफल ठरली सुपरहिट

## तब्बल साडेचार तास रसिक मंत्रमुग्ध; दिव्यांग कलाकारांच्या सादरीकरणाला उत्तम प्रतिसाद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अंधजन कल्याण मंडळातर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी स्टेशन रोडवरील छत्रपती शिवाजी नाट्यगृहात भव्य चॅरिटी संगीत मैफल झाली. तब्बल साडेचार तास चाललेल्या या मैफिलीस रसिकांकडून उत्तम प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व कलाकार दृष्टिदिव्यांग व शासकीय सेवेतील होते. सप्तस्वरांजली म्युझिकल ग्रुपच्या कलाकारांनी देशभक्तीपर, मराठी, हिंदी तसेच अहिराणी सदाबहार गीतांची एकापेक्षा एक सरस गीते सादर करून रसिकांची मने जिंकली. प्रत्येक गाण्यानंतर उपस्थित मान्यवरांकडून प्रोत्साहनपर बक्षिसांचा वर्षाव करण्यात आला. अंधकलाकारांच्या कला, कौशल्य आणि स्वावलंबनाला प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश होता. प्रामुख्याने अमळनेर पालिका, जयनील फाऊंडेशन, मंगळग्रह सेवा संस्था, छत्रपती शिवाजी महाराज गार्डन ग्रुप, कुसुमाई बिझिनेस ग्रुप, जळगाव जनता सहकारी बँक, दृष्टी फाऊंडेशन-पुणे, मोहिनी ब्रास बॅण्ड, जीवनश्री रक्तपेढी-अमळनेर, लायन्स क्लब-अमळनेर, अमळनेर शहर व तालुका पत्रकार संघ यासह इतर संस्था व मान्यवरांनी या कार्यक्रमासाठी भरीव आर्थिक मदत केली. सुरूवातीला मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन होऊन कार्यक्रमास सुरूवात झाली. सदर कार्यक्रमासाठी असंख्य दृष्टिहीन बांधव व भगिनी आवर्जून उपस्थित होते. दरम्यान, कार्यक्रमातून प्राप्त होणारा निधी दृष्टिदिव्यांग बांधवांच्या शिक्षण, आरोग्य, स्वयंरोजगार, कौशल्य विकास आणि इतर सामाजिक कल्याणकारी उपक्रमांसाठी वापरण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या मध्यंतरात काही दृष्टिहीन मुलांना स्कॉलरशिप वितरीत करण्यात आली. या चॅरिटी शोमध्ये नागरिक, उद्योजक, व्यापारी आणि संस्था मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. अंधजन कल्याण मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.




अमळनेर : येथील अंधजन कल्याण मंडळातर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी स्टेशन रोडवरील छत्रपती शिवाजी नाट्यगृहात भव्य चॅरिटी संगीत मैफल झाली. यावेळी एकापेक्षा एक सरस गीते सादर करताना दृष्टिदिव्यांग व शासकीय सेवेतील कर्मचारी.

# 'बीएलओं'नाही 'एआयआरओ'प्रमाणे मानधन द्या

## अमळनेर तालुका बीएलओ न्याय्य हक्क समितीची मागणी; मागणी मान्य न झाल्यास आंदोलन



अमळनेर : तालुका बीएलओ न्याय्य हक्क समितीच्या रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी टाऊन हॉलमध्ये झालेल्या बैठकीवेळी एकत्रित आलेले 'बीएलओ'.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर) कामात 'बीएलओ' अत्यंत प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत. मात्र, नियमित कामासोबतच अतिरिक्त कामाचा वाढता बोजा आणि सततच्या कामाच्या दबावामुळे 'बीएलओं'वर मोठ्या प्रमाणात मानसिक व शारीरिक ताण निर्माण होत आहे. त्यामुळे 'एआयआरओ'प्रमाणे 'बीएलओं'नाही मानधन मिळायला हवे, असा सूर बैठकीत सर्वानुमते व्यक्त करण्यात आला.

'बीएलओं'च्या विविध प्रश्नांवरील चर्चेसाठी अमळनेर तालुका बीएलओ न्याय्य हक्क समितीची रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी टाऊन हॉलमध्ये बैठक झाली. त्यात 'बीएलओं'ना त्यांच्या कामाच्या तुलनेत योग्य मानधन मिळावे, ही प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच 'एआयआरओं'ना अनुक्रमे ३० हजार व २५ हजार रुपये मानधन मंजूर झाले असल्याने त्याच पद्धतीने 'बीएलओं'नाही दिले जावे, अशी मागणी करण्यात आली. जर ही मागणी मान्य न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असाही निर्णय यावेळी घेण्यात आला.

बैठकीस भगवान पाटील, डॉ. कुणाल पवार, अजय भामरे, हेमंत महाजन, रामेश्वर भदाणे, ज्ञानेश्वर गांधलीकर, रमेश पाटील, अशोक जाधव, दीपककुमार पाटील, सर्जेराव पाटील, जयवंत पाटील, गोविंदा माळी, सोमनाथ विसपुते, प्रसाद जोशी, भूषण महाले, प्रदीप पाटील, सोपान मोरे, विकास पाटील, सुनील मराठी, सागर महाजन, विशाल साळुंखे, सतीश बडगुजर, रईस शे. अब्दुल्ला, रमेश मंगसुळे, सुधीर पाटील, किशोर चौधरी, जगदीश पाटील, अर्जुन वसावे, दीपक पाटील, भटेश्वर भदाणे, राजेंद्र पाटील, धीरज कोटवाल, महेंद्र रत्नपारखी, जितेंद्र वाणी, प्रफुल्ल भदाणे, भूपेंद्र वानखेडे, विकास चौधरी, जगदीश शि. पाटील, अतुल भोई, उज्ज्वल मार्कंडेय, मकरंद निळे, किरण ठाकूर, गुलाब बोरसे, धर्मा धनगर, भरत पाटील, गिरीश पाटील, स्वप्नील पाटील, एस. व्ही. पाटील, ज्ञानेश्वर मोरे आदी उपस्थित होते.

# रोटरी क्लबचा ऐतिहासिक गौरव; तब्बल १९ पुरस्कार

## वर्षभरातील समाजोपयोगी उपक्रम, सामाजिक बांधिलकीची घेतली दखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० च्या वतीने नाशिक येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात रोटरी क्लब, अमळनेरने तब्बल १९ पुरस्कार व सन्मान मिळवत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. वर्षभरातील समाजोपयोगी उपक्रम, उत्कृष्ट प्रकल्प, नेतृत्व, सदस्यांचा सहभाग आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेत हा गौरव करण्यात आला.

क्लबला डिस्ट्रिक्ट गव्हर्नर कप, उत्कृष्ट कार्याचे प्रशंसापत्र, नैसर्गिक आपत्तीतील कार्य, 'दिल से दिल तक', हृदय शस्त्रक्रिया उपक्रम, चार मार्ग चाचणीचा उत्कृष्ट वापर, सर्वोत्तम उपस्थिती यांसह विविध पुरस्कार मिळाले. पोलिओ निर्मूलन, इंटरॅक्ट, रोटरॅक्ट, आर.सी.सी. व कुटुंब कल्याण उपक्रमांसाठीही क्लबला सन्मानित करण्यात आले. नवीन पारोळा रोटरी क्लबच्या निर्मिती व संगोपनाबद्दल विशेष प्रशस्तीपत्र देण्यात आले.

रोटरी वर्ष २०२५-२६ मध्ये अध्यक्ष देवेंद्र कोठारी व सचिव आशिष चौधरी यांच्या नेतृत्वाखाली सदस्यांनी आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सामाजिक सेवा व आपत्ती मदत आदी क्षेत्रांत विविध उपक्रम राबविले. नाशिक येथील गुरुदक्षिणा सभागृहात झालेल्या कार्यक्रमास सहाय्यक गव्हर्नर पूनम कोचर, अभिजित भांडारकर, रोहित सिंघवी, प्रदीप पारख, राजेश जैन, प्रतीक जैन, योगेश येवले, वृषभ पारख, सचिन चोपडा व पीयूष शहा यांची उपस्थिती होती. या यशाबद्दल रोटरी क्लबचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.



अमळनेर : रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० च्या वतीने नाशिक येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात येथील रोटरी क्लबने तब्बल १९ पुरस्कार व सन्मानचिन्ह मिळवत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. पुरस्कार व सन्मानचिन्ह स्वीकारल्यानंतर जल्लोष करताना अध्यक्ष देवेंद्र कोठारी व सचिव आशिष चौधरी यांच्यासह सहाय्यक गव्हर्नर पूनम कोचर, अभिजित भांडारकर, रोहित सिंघवी, प्रदीप पारख, राजेश जैन, प्रतीक जैन, योगेश येवले, वृषभ पारख, सचिन चोपडा व पीयूष शहा.

# पावसाळी सातपुडा ट्रेकिंगमधून अनुभवले निसर्गसौंदर्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील निसर्ग मित्र मंडळातर्फे नुकतेच एकदिवसीय पावसाळी सातपुडा ट्रेकिंगचे आयोजन करण्यात आले. पावसाळ्यातील धुक्याने नटलेल्या सातपुडा पर्वतरांगांमधील निसर्गसौंदर्याचा अनुभव घेत निसर्गप्रेमींनी गिरीभ्रमणाचा आनंद लुटला.



या ट्रेकिंगदरम्यान सातपुड्यातील बोरअजंटी, तेल्याघाट, वैजापूर परिसरातून वाहणारी अनेर नदी ओलांडून ट्रेकर्सनी मध्य प्रदेशातील गेरूघाटी पर्वतरांगांमध्ये प्रवेश केला. पुढे सुमारे सात किलोमीटरवर असलेल्या ताजुद्दीन डोंगरावर त्यांनी भ्रमंती केली. श्रावण-भाद्रपद महिन्यात हा परिसर धुक्याने वेढलेला असल्याने डोंगराचे निसर्गरम्य रूप अधिकच खुलून दिसत होते. ताजुद्दीन बाबांच्या दर्ग्याजवळील देवी मंदिर, गिरीभ्रमणाच्या मार्गावर खळखळ वाहणारे ओढे, साग, सलई, अंजन, धावडा, सादडा व बारतोंडी यांसारख्या विविध वृक्षांचे निरीक्षण आम्ही केले. टाक्यापाणी परिसरातील आदिवासींची स्वच्छ घरेही पाहिली. तसेच जंगलातील कटुर्ले, गुंजपत्ता यांसारख्या वेली तसेच सागाच्या झाडांना आलेली पांढरी फुले आम्हाला विशेष भावल्याचे निसर्ग मित्र मंडळाच्या शितल देशमुख, सोमचंद संदानशीव, उमेश वाल्हे, मिलिंद कुडे, प्रा. भराटे, मिलिंद पाटील, धनंजय सोनार, धनराज महाजन, दिलीप सोनवणे व प्रा. धर्माधिकारी यांनी सांगितले.





अमळनेर : येथील आर. बी. पाटील इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. आणि जयनील फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात झाला. यावेळी ध्वजवंदन करताना श्रीमती पुष्पाबाई पाटील. दुसऱ्या छायाचित्रात आर. बी. इन्फ्रास्ट्रक्चरचे कर्मचारी, जयनील फाऊंडेशनचे पदाधिकारी, सदस्यांसमवेत माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील, फाऊंडेशनचे अध्यक्ष गौतम पाटील, उपाध्यक्ष वरुण पाटील आदी.

# आर. बी. पाटील इन्फ्रास्ट्रक्चर आणि जयनील फाऊंडेशनतर्फे स्वातंत्र्यदिन सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : देशभक्ती, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम अनुभवत येथील आर. बी. पाटील इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. आणि जयनील फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात झाला.

माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत देवगाव-देवळी, अमळनेर येथील आर. बी. पाटील इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. बेस कॅम्प येथे सकाळी आठ वाजता राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्यदिन साजरा झाला. श्रीमती पुष्पाबाई भाईदास पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. याप्रसंगी 'शविआ'च्या गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील, हिंगोणे येथील लोकनियुक्त सरपंच श्रीमती राजश्रीताई पाटील, जयनील फाऊंडेशनचे अध्यक्ष गौतम पाटील, उपाध्यक्ष वरुण पाटील यांच्यासह जयनील फाऊंडेशनचे सदस्य आणि आर. बी. इन्फ्रास्ट्रक्चरचे कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आमदार पाटील यांनी उपस्थित सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून मिळालेल्या या अमूल्य स्वातंत्र्याची जपणूक करीत राष्ट्राच्या प्रगतीत आपले योगदान देण्याचा संकल्प करण्यात आला.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# वयाच्या १७ व्या वर्षी उंचावली देशाची मान!

## खेडेगावातील प्रणवला मिळाली ३.५५ कोटींची स्कॉलरशिप; गणितात ठरलाय 'वर्ल्ड टॉपर'

**सक्सेस स्टोरी**



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

छोट्या शहरातूनही जागतिक स्तरावर यश मिळविता येते, हे प्रणवने सिद्ध केले. १३ व्या वर्षीच त्याने मोठी स्वप्ने पाहून नियोजनबद्ध तयारी सुरू केली. गणिताचा उपयोग करून सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील समस्या सोडविण्याचा त्याचा उद्देश आहे. तुम्ही ध्येये मोठी ठेवली तर ती प्रामाणिक कष्ट आणि चिकाटीने गाठू शकता. काही गोष्टी कठीण असल्या तरी त्या अशक्य नसतात. मेहनतीने यशाच्या शिखरावर पोहचता येते. तमिळनाडूच्या इरोड जिल्ह्यातील प्रणव इलांगो या १७ वर्षांच्या तरुणाने हेच साध्य करून दाखविले आहे. प्रणवला अमेरिकेतील प्रतिष्ठित 'आयव्ही लीग' संस्था असलेल्या 'ब्राउन युनिव्हर्सिटी'मध्ये प्रवेश मिळाला आहे. विशेष म्हणजे त्याला ३.५५ कोटी रुपयांची पूर्ण शिष्यवृत्ती मिळाली आहे. या शिष्यवृत्तीमध्ये त्याच्या चार वर्षांच्या शिक्षणाचा खर्च, तसेच राहण्याचा आणि जेवणाचा खर्च समाविष्ट आहे. ही कामगिरी संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद आहे. अनेकदा लोकांचा असा समज असतो, की केवळ मोठ्या शहरांमधील विद्यार्थीच नामांकित आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळवू शकतात; मात्र, प्रणवने कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर हा समज खोटा ठरविला. ब्राउन युनिव्हर्सिटीव्यतिरिक्त, 'युनिव्हर्सिटी ऑफ हाँगकाँग'नेही त्याला १०० टक्के शिष्यवृत्तीची ऑफर दिली होती. एका छोट्या शहरातील मुलाने इतका मोठा टप्पा कसा गाठला, याची ही कहाणी आहे.

### लहान वयातच मोठ्या स्वप्नांचा पाया

प्रणवचे हे यश एका रात्रीत मिळालेले नाही; तर ते अनेक वर्षांचे कठोर परिश्रम आणि एकाग्रतेने केलेल्या तयारीचे फळ आहे. इरोडमधील 'सीएस अकादमी'चा विद्यार्थी असलेल्या प्रणवला वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षीच जाणीव झाली होती, की त्याला आपल्या आयुष्यात काहीतरी वेगळे आणि विशेष करायचे आहे. त्याने 'डेक्सटेरिटी ग्लोबल'च्या 'नॅशनल स्कॉलर डेव्हलपमेंट प्रोग्राम'मध्ये सहभाग घेतला; तेथे त्याला मिळालेले मार्गदर्शन आणि प्रशिक्षण यामुळे त्याचा दृष्टिकोनच बदलून गेला. प्रणव अभ्यासात नेहमीच अव्वल राहिला आहे; त्याने 'केंब्रिज आयजीसीएसई' गणित परीक्षेत 'वर्ल्ड टॉपर'चा (जागतिक स्तरावर प्रथम येण्याचा) मानही मिळविला होता.

विद्यार्थी अनेकदा गणिताकडे केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविण्यासाठी अभ्यासाचा एक विषय म्हणून पाहतात. मात्र, प्रणवसाठी गणित हे केवळ पाठ्यपुस्तके किंवा सूत्रांपुरते मर्यादित नव्हते. अत्यंत गुंतागुंतीच्या जागतिक समस्या समजून घेण्यासाठी आणि त्या सोडविण्यासाठी गणित हे एक प्रभावी साधन आहे, अशी त्याची ठाम धारणा आहे. याच विचारातून त्याने उच्च शिक्षणासाठी एक वेगळा मार्ग निवडला आणि वरकरणी भिन्न वाटणाऱ्या दोन शाखांची सांगड घातली. प्रणव आता ब्राउन युनिव्हर्सिटीमध्ये 'पब्लिक हेल्थ' (सार्वजनिक आरोग्य) आणि 'अप्लाइड मॅथेमॅटिक्स' (उपयोजित गणित) या विषयांचा अभ्यास करणार आहे.

गणित आणि आरोग्य यांचा काय संबंध, असा प्रश्न तुम्हाला पडू शकतो; थोडक्यात सांगायचे तर डेटा, तंत्रज्ञान आणि गणित यांचा मेळ घालून आरोग्य क्षेत्रातील आव्हाने सोडविणे हे प्रणवचे उद्दिष्ट आहे. त्याला असे एखादे व्यासपीठ किंवा उपक्रम सुरू करायचा आहे, ज्याद्वारे सरकार आणि सामान्य जनतेला विश्वसनीय आरोग्यविषयक आकडेवारी आणि अचूक माहिती मिळेल. विशेषतः अशा दुर्गम किंवा मागास भागांमध्ये जिथे अजूनही पुरेशा आरोग्य सुविधा आणि योग्य माहितीचा अभाव आहे.

### ब्राउन युनिव्हर्सिटीचा वारसा

प्रणव जिथे शिक्षण घेणार आहे त्या ब्राउन युनिव्हर्सिटीची स्थापना १७६४ मध्ये झाली. ही जगातील आठ प्रतिष्ठित 'आयव्ही लीग' संस्थांपैकी एक आहे. येथे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विविध ज्ञानशाखांची सांगड घालून संशोधन करण्याची संधी मिळते. आपल्याला मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच आपला दृष्टिकोन अधिक व्यापक झाला, असे प्रणव मानतो. अमेरिकेतील शिक्षण पूर्ण केल्यानंतर, जगभरातील गरजू समुदायांना मदत करण्याचा त्याचा मानस आहे. मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस करणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी प्रणवची ही यशोगाथा प्रेरणादायी ठरते.



# आयुर्वेदानुसार कोणते पदार्थ एकत्र खाऊ नयेत?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुर्वेदानुसार काही अन्नपदार्थांचे एकत्र सेवन हे विरुद्ध आहार मानले जाते, कारण त्यामुळे पचनावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

**आंबट फळे :** दूध आणि आंबट फळे, उदा. संत्रे, मोसंबी, लिंबू एकत्र खाणे टाळावे, असे आयुर्वेदात सांगितले आहे.

**मासे :** दूध आणि मासे यांचे एकत्र सेवनही विरुद्ध आहार मानले गेले आहे. दूध आणि मीठ एकत्र घेणे आयुर्वेदानुसार अयोग्य मानले जाते.

**तूप :** मध आणि तूप समप्रमाणात मिसळून खाणे टाळावे, असा उल्लेख आयुर्वेदातील काही ग्रंथांमध्ये आहे.

**दुग्धजन्य पदार्थ :** फळांसोबत जड दुग्धजन्य पदार्थ किंवा जेवणासोबत फळे खाण्याऐवजी योग्य अंतर ठेवणे अधिक फायद्याचे मानले जाते.

**अतिथंड पेये :** गरम अन्नासोबत अतिथंड पेये घेणे पचनशक्तीवर परिणाम करू शकते, असे आयुर्वेदात नमूद आहे.

**विरुद्ध आहार :** वारंवार असे विरुद्ध आहाराचे सेवन केल्यास अपचन, ॲसिडिटी आणि इतर पचनविषयक तक्रारी वाढू शकतात.

**आयुर्वेद :** ताजे, ऋतूनुसार आणि सहज पचणारे अन्न योग्य प्रमाणात खाण्यावर आयुर्वेद भर देतो.

**पचनास अनुकूल :** आयुर्वेदानुसार निरोगी राहण्यासाठी विरुद्ध आहार टाळून संतुलित आणि पचनास अनुकूल आहार घेणे महत्त्वाचे मानले जाते.

# शिवरायांच्या काळात शस्त्रास्त्रांचा कसा होता बाजार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शिवरायांच्या काळात कसा असायचा शस्त्रास्त्रांचा बाजार? पाहा ३५० वर्षांपूर्वीचे फोटो.


**बाजार :** शिवरायांच्या काळात तलवार, कट्यार, खंजीर यांसारखी शस्त्रे बाजारात सहजपणे खरेदी-विक्री केली जात असत.

**गरज :** त्या काळात शस्त्रे ही अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याप्रमाणेच दैनंदिन जीवनातील आवश्यक वस्तू मानली जात होती.

**चित्र :** मध्ययुगीन लघुचित्रांमधून तत्कालीन शस्त्रांच्या बाजारपेठांची आणि व्यापाराची अनेक रोचक माहिती समोर येते.

**दुकान :** इसवी सन १६४०-५० च्या सुमारास मंडी शैलीत रंगवलेल्या चित्रात शस्त्रांचे स्वतंत्र दुकान स्पष्टपणे दिसते.

**विक्री :** या दुकानांमध्ये



तलवारीच्या मुठी, कट्यारी, चाकू आणि शस्त्रांच्या म्यानांसह विविध वस्तू विक्रीसाठी मांडलेल्या होत्या.

**ग्राहक :** चित्रात दुकानदार ग्राहकाला कट्यार दाखवत असल्याचे दृश्य त्या काळातील शस्त्रांच्या खरेदी-विक्रीची कल्पना देते.

**बाजारपेठ :** १७६०-७० च्या सुमारास मुर्शिदाबादच्या बाजाराचे चित्रण करणाऱ्या चित्रातही शस्त्रे विकणारे व्यापारी दिसतात.

**व्यापार :** कट्यारी, खंजीर, पेशकब्ज आणि लहान शस्त्रांची उपकरणे बाजारात इतर दैनंदिन वस्तूंप्रमाणेच विकली जात होती.

**कारागीर :** शस्त्रांची निर्मिती, दुरुस्ती आणि सजावट करणाऱ्या विविध कारागिरांची स्वतंत्र व्यवस्था तत्कालीन समाजात अस्तित्वात होती.

**घासाघीस :** आज भाजीपाला किंवा कपड्यांच्या बाजारात जशी किंमतीवर घासाघीस होते, तशीच रास्त्रांच्या खरेदीतही होत असावी.

**हास :** बदलते युद्धतंत्र आणि आधुनिक शस्त्रांमुळे भारताची पारंपरिक शस्त्रव्यवस्था एकोणिसाव्या शतकात हळूहळू लयाला गेली.

**वारसा :** या व्यवस्थेसोबत शस्त्रनिर्मितीचे ज्ञान, व्यापारपद्धती, सजावटीच्या कला आणि युद्धकौशल्यांचा महत्त्वाचा वारसाही काळाच्या पडद्याआड गेला.

# दहा दिवसांत मोगऱ्याचे रोप कळ्यांनी भरून जाईल

## कुंडीत टाकून बघा 'या' ५ टाकाऊ गोष्टी; येतील भरपूर फुले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अंगणभर दरवळणारा मोगऱ्याचा सुगंध आणि त्याच्या पांढऱ्या पाकळ्यांचा देखणा बहर हे कोणाला आवडणार नाही? मोगरा फुलाचा सुगंध खूप मनमोहक असतो आणि तो खूप आकर्षकदेखील दिसतो. घरात मोगरा लावल्याने वातावरण सुगंधित होते. अनेक जण घराच्या बाल्कनीत, टेरेस गार्डनमध्ये आवडीने इतर फुलझाडांसह मोगऱ्याचे रोप लावतात. पण कधी-कधी मोगऱ्याचे रोप लावूनही त्यावर फूल येत नाही. त्यांची पाने, कळ्या सुकून जातात. ज्यामुळे तो कोमेजून जातो. पाणी, सूर्यप्रकाश मिळाला तरी काही फायदा होत नाही आणि मनात प्रश्न येतो "अखेर फुले का येत नाहीत?"



तुमच्या याच प्रश्नाचे उत्तर आम्ही तुमच्यासाठी घेऊन आलो आहोत. मोगऱ्याच्या रोपाचा बहर अचानक कमी झाल्याने काय करावे ते समजत नाही. पण काळजी करू नका. मोगऱ्याला भरपूर फुले येण्यासाठी आम्ही तुमच्यासाठी उपाय घेऊन आलो आहोत. घरच्या घरी मिळणाऱ्या काही साध्या गोष्टी मोगऱ्याच्या मुळाशी टाकल्यास तो फुलांनी लगडून जाईल. खर्च जवळजवळ नाही, पण परिणाम जबरदस्त. कोणत्या गोष्टी मोगराऱ्याच्या रोपासाठी वरदान ठरू शकतात, ते आज आपण जाणून घेऊया.

'या' ५ गोष्टींनी मोगऱ्याचे रोप बनेल फुलांनी गच्च; कचरा होईल खजिना.

### १) लसूण पाणी : फुलांसाठी जादुई टॉनिक

लसणात असलेले अँटीफंगल आणि अँटीबॅक्टेरियल गुण मातीला पोषण देतात. लसणाच्या तीन-चार पाकळ्या ठेचून रात्रभर पाण्यात भिजत ठेवा, सकाळी ते पाणी गाळून मोगऱ्याच्या मुळाशी ओता. काही दिवसांत फरक जाणवेल.

### २) डाळीचे पाणी : घरचे नैसर्गिक खत

डाळ धुताना जे पाणी निघतं, ते कधीही वाया घालवू नका. डाळीचे ताजे पाणी थेट मोगऱ्याच्या मुळाशी टाकल्याने झाडाला भरपूर पोषण मिळते आणि कळ्या फुटायला लागतात.

### ३) लाकडाची राख : पोटॅशियमचा स्रोत

लाकडाची थोडीशी राख मोगऱ्यासाठी उपयुक्त असते; पण जास्त प्रमाण हानिकारक ठरू शकते. काळजीपूर्वक मुळाशी टाका.

### ४) तांदळाचे पाणी : गुपित पोषण

तांदूळ धुताना जे पाणी निघते, ते पातळ करून मोगऱ्याच्या मुळाशी टाका. हे पाणी झाडाच्या वाढीस आणि फुलांच्या उमलण्यास मदत करते.

### ५) आंबट ताक : नैसर्गिक फर्टिलायझर

१५-२० दिवसांच्या अंतराने पातळ आंबट ताक मोगऱ्याच्या मुळाशी टाकल्यास झाडाची फुले येण्याची क्षमता वाढते.

**माळ्यांचा सल्ला :** कोणतेही नैसर्गिक खत १५-२० दिवसांच्या अंतरानेच वापरा. जास्त प्रमाणात खत वापरल्यास झाड खराब होऊ शकते.

# ये कैसी टेक्नॉलाजी है? अब हवा से बनेगा पीने का पानी

## बिना बारिश मिलेगा शुद्ध जल, 'डब्ल्यूएई'ने लॉन्च की 'ॲक्वा स्मिथ'


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पानी की बढ़ती कमी और स्वच्छ पेयजल की चुनौती के बीच इंजीनियरिंग और सस्टेनेबिलिटी क्षेत्र में काम करने वाली कंपनी 'डब्ल्यूएई' 'डब्ल्यूएई लिमिटेड'ने एक ऐसी तकनीक पेश करने का दावा किया है, जो बिना बारिश और किसी बाहरी जल स्रोत के हवा से पीने योग्य पानी तैयार कर सकती है। कंपनी ने इस नई तकनीक पर आधारित उत्पाद 'ॲक्वा स्मिथ' लॉन्च किया है, जिसे खासतौर पर उन इलाकों के लिए विकसित किया गया है जहां पानी की भारी कमी है या स्वच्छ पेयजल आसानी से उपलब्ध नहीं हो पाता।

'डब्ल्यूएई' के सीईओ दीपक ने बताया कि कंपनी पिछले १७ सालों से सस्टेनेबिलिटी और नए इनोवेशन पर लगातार काम कर रही है। उनका कहना है कि 'डब्ल्यूएई' का उद्देश्य केवल बेहतर जल समाधान उपलब्ध कराना नहीं, बल्कि दुनिया को प्लास्टिक-फ्री बनाने की दिशा में भी महत्वपूर्ण योगदान देना है। दीपक के अनुसार, एक्वा स्मिथ वातावरण में मौजूद नमी (ह्यूमिडिटी) का उपयोग कर पानी तैयार करती है।

### २४ घंटे में २४ लीटर शुद्ध पानी तैयार

उन्होंने बताया कि इस तकनीक के जरिए बिना बारिश और किसी बाहरी जल स्रोत के पीने योग्य पानी प्राप्त किया जा सकता है। कंपनी का कहना है कि यह तकनीक उन क्षेत्रों में उपयोगी साबित हो सकती है, जहां जल संकट लगातार बढ़ रहा है और लोगों को स्वच्छ पानी के लिए लंबी दूरी तय करनी पड़ती है। उन्होंने बताया कि फिलहाल इस तकनीक के दो मॉडल उपलब्ध हैं। पहला मॉडल करीब दो घंटे में एक लीटर पानी तैयार करने की क्षमता रखता है, जबकि दूसरा मॉडल २४ घंटे में लगभग २४ लीटर पानी तैयार कर सकता है। कंपनी का कहना है कि दोनों मॉडल घरेलू और छोटे संस्थानों की जरूरतों को ध्यान में रखकर डिजाइन किए गए हैं।



### आरओ सिस्टम में पानी होता है बर्बाद

सीईओ ने बताया कि मशीन से प्राप्त होने वाले पानी का टीडीएस संतुलित रहता है और आधुनिक फिल्ट्रेशन तकनीक के जरिए इसे पीने योग्य बनाया जाता है। उनके मुताबिक, मशीन में तैयार होने वाला पानी गुणवत्ता के मानकों के अनुरूप होता है और उपयोग के लिए सुरक्षित रहता है। दीपक ने कहा कि पारंपरिक आरओ सिस्टम में पानी का काफी हिस्सा बर्बाद हो जाता है। इसी समस्या का समाधान तलाशते हुए कंपनी ने ऐसी तकनीक विकसित करने का प्रयास किया, जिसमें पानी की बर्बादी न हो और लोगों को स्वच्छ पेयजल का एक नया विकल्प मिल सके। उनका मानना है कि भविष्य में इस तरह की तकनीक जल संरक्षण के साथ-साथ पर्यावरण संरक्षण में भी अहम भूमिका निभा सकती है।

### दुनिया को प्लास्टिक-फ्री बनाना ही विजन

उन्होंने बताया कि कंपनी के संस्थापक अनुपम जोशी का विजन दुनिया को प्लास्टिक-फ्री बनाना और लोगों को टिकाऊ जल समाधान उपलब्ध कराना है। इसी सोच के साथ 'डब्ल्यूएई' लगातार ऐसी तकनीकों पर काम कर रही है, जो पानी की उपलब्धता बढ़ाने के साथ पर्यावरण पर पड़ने वाले नकारात्मक प्रभाव को भी कम करें। कंपनी का कहना है कि यह मशीन खासतौर पर उन परिवारों के लिए उपयोगी हो सकती है, जिनकी प्रतिदिन २४ से ५० लीटर पानी की आवश्यकता होती है। ग्राहक अपनी जरूरत के अनुसार उपयुक्त मॉडल का चयन कर सकते हैं।

### इंजीनियरिंग और सस्टेनेबिलिटी आधारित जल समाधान

इसके अलावा होटल, कार्यालय, शैक्षणिक संस्थान और अन्य व्यावसायिक प्रतिष्ठान भी इस तकनीक का उपयोग कर सकते हैं। 'डब्ल्यूएई लिमिटेड' इंजीनियरिंग और सस्टेनेबिलिटी आधारित जल समाधान उपलब्ध कराने वाली कंपनी है। कंपनी जल शुद्धिकरण, वाटर ट्रीटमेंट, डिस्पेंसिंग सिस्टम और सर्कुलर हाइड्रेशन इंफ्रास्ट्रक्चर के क्षेत्र में काम करती है। उसके समाधान हॉस्पिटैलिटी, कमर्शियल और संस्थागत क्षेत्रों में जल गुणवत्ता सुधारने, पर्यावरणीय प्रभाव कम करने और संसाधनों के अधिक जिम्मेदार उपयोग को बढ़ावा देने के उद्देश्य से विकसित किए गए हैं।




# आज श्रावणी मंगळवार : मंगळागौर पूजाविधी; मांगलिक व आरोग्यदायी व्रत



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

***श्रावण हा धार्मिक व्रत-वैकल्यांचा पवित्र महिना. श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे, या कवितेतील वर्णनाप्रमाणे श्रावण हा कुंद पावसाचा मन प्रफुल्लित करणारा महिना. अशाच प्रफुल्लित चित्तवृत्तींनी येते श्रावणातील मंगळागौर. महाराष्ट्रासह अन्य भागात गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६ पासून श्रावणाचा प्रारंभ झाला आहे. श्रावणात मंगळागौर व्रताला विशेष महत्त्व आहे. नवविवाहितेने श्रावणात करण्याची जी धार्मिक व्रते पूर्वापार चालत आली आहेत त्यातील शिवामूठ, गोपद्म यासारखेच मंगळागौर हे एक व्रत. मंगळागौरीस धार्मिक, सांस्कृतिक आणि आरोग्यदायी असे अनेक पदर आहेत. मंगळागौर या व्रताची परंपरा महाराष्ट्रासह भारताच्या अनेक भागांत आढळते. मंगळागौर हे प्रामुख्याने कौटुंबिक सुख-समृद्धीसाठी व्यक्तिगत पातळीवर करायचे व्रत आहे. मात्र, महाराष्ट्रात या धार्मिक व्रताला सांस्कृतिक सामूहिकतेची अनोखी जोड लाभलेली दिसते. मंगळागौरीची ही सांस्कृतिक परंपरा, काळ झपाट्याने बदलत असला तरी टिकून राहिली आहे. मंगळागौरीचे व्रत, परंपरा आणि मान्यता याविषयी जाणून घेऊ.***

### मंगळागौरचे महत्त्व

मंगळागौर हे नवविवाहितेने करण्याचे व्रत आहे. यंदा २०२६ मधील १८ ऑगस्ट रोजी श्रावणी मंगळवार आहे. मंगळागौरीचे हे व्रत नवविवाहितेला अखंड सौभाग्य व तिच्या सासर-माहेरास सुखसमृद्धी लाभावी. पतीला दीर्घायुष्य लाभावे, या भावनेने केले जाते. हे व्रत म्हणजे भगवान शंकरांची पत्नी गौरी हिच्या पूजेचे व्रत आहे. हे व्रत श्रावणातील मंगळवारी केले जाते म्हणून त्यास 'मंगळागौरी' असे म्हटले जाते. मांगलिक व्रत म्हणूनही त्यास मंगळागौर म्हणता येईल. हे व्रत नवविवाहितेने लग्नानंतर पहिली पाच वर्षे करायचे असते. श्रावणातील प्रत्येक मंगळवारी मंगळागौरीची विधिवत पूजा करायची व पाचव्या वर्षी आईला वाण देऊन व्रताचे उद्यापन करायचे, अशी प्रथा आहे. रूढीनुसार एक मंगळागौर माहेरची व एक सासरची अशी साजरी केली जाते. व्यावहारिक सोय म्हणून दोन्हीकडची एकच मंगळागौरही अनेक घरांमध्ये एकत्रित स्वरूपात केली जाते.

### मंगळागौर व्रतपूजन

सकाळी उठल्यावर स्नानादी नित्यकर्म आटोपल्यानंतर मंगळागौर व्रताचा संकल्प करावा. अन्नपूर्णा देवींची मूर्ती चौरंगावर स्थापन करावी. सर्वप्रथम गणपती पूजन, कलश-घंटा-दीप पूजन करून मंगळागौर किंवा अन्नपूर्णेच्या मूर्तीवर शिव-मंगळागौरीचे आवाहन करावे. यानंतर षोडशोपचारे पूजा करावी. काही ठिकाणी देवींना कणकेचे अलंकार वाहण्याची पद्धत आहे. नंतर देवींची अंगपूजा करून देवींना विविध पत्री, फुले वाहावीत. नंतर तांदूळ, पांढरे तीळ, जिरे, मुगाची डाळ इत्यादी धान्ये मूठीने अर्पण करावीत. धूप-दीप-नैवेद्य अर्पण करावा. षोडशोपचार पूजा झाल्यावर सर्व प्रकारच्या संपत्ती प्राप्ती, दीर्घायुष्य, अखंड सौभाग्य प्राप्ती व सर्व मनोकामना पूर्ण होण्याकरिता देवीला तीन अर्घ्य द्यावीत. यानंतर मंगळागौरीची कहाणी वाचावी. देवीला विविध पक्वान्नांनी युक्त महानैवेद्य अर्पण करून कणकेच्या सोळा दिव्यांनी व काडवातींनी आरती करावी. सायंकाळी पुन्हा देवींची आरती करून देवीसमोर पारंपारिक खेळ खेळून जागरण करावे.

### मंगळागौरीचे खेळ

मंगळागौरीचे व्रत व्यक्तिगत असले तरी पूजा मात्र सामूहिक केली जाते. यात जिची मंगळागौर असेल तिच्यासोबत गावातील, नात्यातील, ओळखी-पाळखीतील इतरही नवविवाहित मुलींना पूजेसाठी बोलाविले जाते. पूर्वी घरे मोठी, ऐसपैस असायची. त्यामुळे मंगळागौर घरातच पुजली जायची. आता शहरांत गरजेनुसार हॉल किंवा एखाद्या मंदिराची जागा भाड्याने घेऊन मंगळागौर केली जाते. मनोभावे पूजलेल्या या शिवपार्वतींच्या साक्षीने रात्र जागविली जाते. पूर्वी मुलींच्या खेळण्या-बागडण्याच्या वयात लग्ने व्हायची. हीच हौस या खेळांतून भागविली जायची. खेळांचे स्वरूप घरात खेळता येतील असे आणि स्त्रीसुलभ आहे. जुन्या-जाणत्या स्त्रियांकडून माहिती घेतल्यास या खेळांचे तब्बल ७२ प्रकार व उपप्रकार सांगितले जातात. प्रत्येक खेळाला लयबद्धता आहे व त्यासोबतची गाणी ही स्त्रीभावनांचे, तिच्या कौटुंबिक सुखदु:खांचे हे प्रतिबिंब आहे.

### फुगड्या

मंगळागौरीच्या खेळात पट्टीच्या खेळणाऱ्या असतील तर साधी फुगडी, एका हाताची फुगडी, त्रिफुला फुगडी, चौफुला फुगडी, दंड फुगडी, कंबर फुगडी, गुडघ्याची फुगडी, केरसुणी फुगडी, जाते फुगडी, बस फुगडी, भुई फुगडी किंवा बैठी फुगडी, कासव फुगडी, पाट फुगडी, लोळण फुगडी, लाटणे फुगडी आणि फुलपाखरू फुगडी असे फुगडीचे अनेक प्रकार खेळले जातात. फुगडीनंतर दोन-तीन प्रकाराचा झिम्मा, तळ्यात-मळ्यात, खुर्ची का मिर्ची, नाच गं घुमा, आटुंश पान, तिखट मीठ मसाला, तांदूळ सडू बाई, कीस बाई कीस.. दोडका कीस, आगोटं-पागोटं, कोंबडय़ाचे तीन-चार प्रकार, आळुंकी-साळुंकी, सासू-सुनेचे अथवा सवतींचे भांडण, आवळा वेचू की कवळा वेचू, किकीचे पान, माझी आई मोठी की तुझी आई मोठी, नखोल्या, ताक, सोमू-गोमू, काच-किरडा, धोबीघाट, होडी, मासा, भोवर भेंडी, अडवळ घूम, पडवळ घूम, गोफ असे मजेदार व प्रसंगी मिश्कील खेळ रंगत जातात.

### आरोग्यदायी मंगळागौर

नाचण्याचे अंग काहींना उपजतच असते. बॉलडान्स, साल्सा, कथ्थक, भरतनाट्यम्, ओडिसी हे नृत्याचे हल्ली सार्वजनिक स्वरूपात केले जाणारे प्रकार. पण पूर्वी असे नव्हते. घरांदाज मुलींनी नाचणे फारसे समाजमान्य नव्हते. मंगळागौरीच्या निमित्ताने ही हौस भागविली जायची. पण हे खेळ केवळ मौजमजेसाठी नाहीत. या खेळांतून आणि त्यासोबतच्या गाण्यांतून वागण्या-बोलण्याची, स्वत:चा आणि कुटुंबातील इतरांचाही तान-मान व तोल सांभाळण्याची शिकवण नकळतच दिली जायची. आजच्या काळात जिममध्ये जाऊन मशिन्सच्या मदतीने ज्या फिटनेसच्या मागे धावले जाते, तोच फिटनेस मैत्रिणी-सख्यांच्या साहाय्याने बिनपैशात मिळविण्यासाठी हे खेळ. मन दिसत नाही, पण शारीरिक तंदुरुस्तीसाठी प्रसन्न व आनंदी मनही तेवढेच आवश्यक आहे, हे आता विज्ञानानेही मान्य केले आहे. मानसिक आनंदाचे, प्रफुल्लतेचे सहज-सुलभ साधन म्हणूनही हे खेळ गेले व आजही खेळले जात आहेत.



## श्रावणात शुद्ध सप्तमीला 'शितळा सप्तमी' का म्हणतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावण महिन्यात शुद्ध सप्तमीला 'शितळा सप्तमी' किंवा 'शिळासप्तमी' असे म्हणतात. शितळा सप्तमी बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वत्र साजरी होईल.

### काय करतात या दिवशी?


१) घरातील चूल, शेगडी, आधुनिक युगात गॅस स्टोव्ह व इतर स्वयंपाक शिजत असलेल्या साधनांची स्वच्छता करून त्यांची पूजा करतात.
२) या दिवशी शितळा देवीची पूजा करतात अर्थात चूल पेटवत नाही कारण शितळा माता चुलीजवळ वावरत असते, अशी समजूत आहे.
३) षष्ठीच्या दिवशी खाद्य पदार्थ तयार करून ठेवले जातात.
४) सप्तमीला या पदार्थांचे नैवेद्य दाखवून प्रसाद ग्रहण केला जातो.
५) या दिवशी सा कुमारिकांना भोजन दिले जाते.
६) या दिवशी जलाशयांची पूजा करण्याचीही प्रथा आहे. या पूजेने मुलांना आजार होत नाही आणि त्यांच्यावरील संकट दूर होतात, अशी धारणा आहे.
७) आदल्याच दिवशी पुऱ्या, दशम्या, मुगाची सुकी डाळ, पंचामृत, भात, असे पदार्थ करून ठेवले जातात. दुसऱ्या दिवशी नैवेद्य दाखवून हा प्रसाद ग्रहण केला जातो.
८) या दिवशी शिळे अन्न ग्रहण करण्याची प्रथा असल्याने हिला 'शिळा सप्तमी' असेही म्हणले जाते. या दिवशी सात कुमारिकांना भोजन दिले जाते. आपल्या नित्याच्या कार्यात ज्या गोष्टी उपयोगी पडतात, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस.

शितळा ही मातृका देवता आहे. मातृकांचा वास हा जलाशया काठी मानला जातो. या दिवशी जलाशयांची पुजा करण्याची प्रथा काही भागात आहे. त्यांची पूजा केल्याने लहान मुलांना कसलाही रोग होत नाही. सौभाग्यप्राप्ती, दारिद्र्यनाश व संतानप्राप्ती होते, अशी लोक धारणा आहे.

# आज कल्की जयंती : भगवान विष्णूंच्या शेवटच्या अवताराविषयी 'या' रहस्यमयी गोष्टी माहिती आहेत का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दुष्टांचा नाश करण्यासाठी आणि पापाची मर्यादा ओलांडल्यावर पुन्हा धर्माची स्थापना करण्यासाठी भगवान कल्की कलियुगात अवतार घेतील. श्रीमद्भागवत पुराण आणि कल्की पुराणानुसार भगवान कल्कींचा अवतार कलियुगाच्या शेवटी आणि सत्ययुगाच्या आधीच्या कालावधीत होईल. कल्की जयंती दरवर्षी श्रावण महिन्यात शुक्ल पक्षाच्या सहाव्या दिवशी साजरी केली जाते. यंदा ती मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वत्र साजरी होईल.



### भगवान विष्णूंचा शेवटचा अवतार

भगवान विष्णूंचा हा अवतार ६४ कलांनी परिपूर्ण असेल आणि जेव्हा सर्वत्र फक्त पाप पसरेल तेव्हा तो लोकांच्या हृदयात भक्ती जागृत करेल. लोक त्याचे पालन करतील आणि धार्मिकतेचा मार्ग आणि पवित्रतेचे युग सुरू होईल. कल्की पुराण कल्कीच्या अवताराबद्दल तपशीलवार वर्णन करते. श्रीमद्भागवतामध्ये सांगितले आहे, की हा भगवान विष्णूंचा शेवटचा अवतार असेल. भागवताच्या बाराव्या स्कंधाच्या दुसऱ्या अध्यायात भगवान कल्कींच्या अवताराची कथा तपशीलवार दिली आहे. परमेश्वराचा हा अवतार निष्कलंक देवांच्या नावाने जगभरात ओळखला जाईल.

### कुठे होईल कल्कींचा जन्म

पुराणांनुसार भगवान कल्कींचा अवतार उत्तर प्रदेशातील मुरादाबादजवळील संभल गावात होईल. त्याचे सर्व भाऊ देवांचे अवतार असतील, जे त्याला पुन्हा धर्म स्थापनेसाठी मदत करतील. भगवान कल्कींचे वडील कलियुगात त्या क्षणीही भगवान विष्णूंचे परम भक्त असतील आणि त्यांना वेद आणि पुराणांचे पूर्ण ज्ञान असेल. त्यांच्या वडिलांचे नाव विष्णुयश आणि आईचे नाव सुमती असेल.

प्रभू श्रीरामचंद्रांच्या अवताराप्रमाणे भगवान कल्कींसह चार भाऊ असतील, ज्यांची नावे सुमंत, प्राज्ञ आणि कवी असेल. याज्ञवल्क्य भगवान कल्कींचे पुजारी असतील आणि भगवान परशुराम त्यांचे गुरू असतील. परशुराम हे भगवान विष्णूंचे अवतार असल्याचे मानले जाते, ज्यांना अमरत्व लाभले आहे. परशुरामांच्या निर्देशानुसार कल्की भगवान शिवांची तपश्चर्या करतील आणि दैवी शक्ती प्राप्त करतील. भगवान कल्कींना दोन बायका असतील, पहिली लक्ष्मी स्वरूप पद्म आणि दुसरी पत्नी वैष्णवी शक्ती रूपा रामा. देवी वैष्णवी म्हणजेच माता वैष्णोदेवी जी रामावताराच्या काळापासून देवांशी लग्नासाठी तपश्चर्या करत आहे, कल्की तिच्या तपश्चर्याने प्रसन्न होईल आणि तिच्याशी लग्न करेल. कल्की भगवान यांना चार मुले होतील, ज्यांची नावे जय, विजय, मेघवाल आणि बलाहक असेल, असे सांगितले जाते.


### कल्कींचे वाहन

अशी मान्यता आहे, की भगवान कल्कींचे वाहन पांढऱ्या रंगाचा घोडा असेल. हा घोडा देवदत्त म्हणून ओळखला जाईल. परमेश्वर घोड्यावर स्वार होऊन जगातील पापी लोकांचा नाश करेल आणि पुन्हा धर्म स्थापन करेल. कल्की जयंतीला भगवान विष्णूंची पूजा करावी आणि त्यांच्या नावाने उपवास करावा. तसेच कल्की जयंतीच्या दिवशी गरीब आणि गरजूंना अन्नदान केले पाहिजे.

## बिल्वपत्र महात्म्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१) बिल्व वृक्षाजवळ सर्प कधीही येत नाही.
२) कुणाचीही अंत्ययात्रा जर बिल्व वृक्षाच्या सावलीतून जात असेल तर त्यास मोक्ष मिळतो.
३) वायुमंडळात व्याप्त अशुध्द वातावरणास थांबविण्याची क्षमता सर्वांत ज्यास्त बिल्व वृक्षात असते.
४) ४, ५, ६, ७ पानांचे बेल पत्र ज्यास प्राप्त होतात तो परम भाग्यशाली असून जर ते बिल्वपत्र भगवान शिवजींना अर्पण करण्याने अनंत पट पुण्यफल प्राप्त होते.
५) बिल्व वृक्षास कापल्याने वंशाचा नाश होतो आणि बिल्व वृक्ष लावण्याने वंश वृद्धी होते.
६) सकाळ-सायंकाळ बिल्व वृक्षाचे दर्शन घेतल्याने पापांचा नाश होतो.
७) बिल्व वृक्षास कायम पाणी दिल्याने पित्तर तृप्त होतात.
८) बिल्वपत्र आणी ताम्र धातूच्या विशेष प्रयोगाने पूर्वी ऋषी-मुनी स्वर्णधातूचे उत्पादन करत होते.
९) जीवनात फक्त एकवेळेस आणि तेही नकळत शिवलिंगावर बिल्वपत्र अर्पण केल्यास सर्व पापांतून मुक्ती मिळते.
१०) बिल्व वृक्ष रोपण, पोषण आणि संवर्धन करण्याने देवाधिदेव महादेव यांचा साक्षात्काराचा अवश्य लाभ होतो.
११) बिल्व वृक्षाचे शेतात पाण्याची कमतरता नसते.



# काळभैरव बाबा : काळाचे अधिपती, धर्मरक्षक आणि महादेवांचे रौद्ररूप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान शिवांचे स्वरूप म्हणजे अनंत शक्ती, करुणा, ज्ञान आणि संहार यांचा अद्भुत संगम. शिवांच्या अनेक दिव्य रूपांपैकी काळभैरव बाबा हे अत्यंत सामर्थ्यशाली, रौद्र आणि रहस्यमय स्वरूप मानले जाते. काळभैरवांचे उग्र रूप पाहताना मनामध्ये क्षणभर भय निर्माण होऊ शकते; परंतु त्यांच्या या रौद्रतेमागे विनाशाची भावना नसून अधर्म, अहंकार, अज्ञान, नकारात्मकता आणि भीतीचा नाश करण्याची दिव्य शक्ती दडलेली आहे. म्हणूनच काळभैरवांना धर्माचे रक्षक, पवित्र क्षेत्रांचे क्षेत्रपाल आणि काळाचे अधिपती म्हणून श्रद्धेने पूजले जाते. त्यांच्या उपासनेत केवळ भक्ती नाही, तर सत्य, शिस्त, संयम, निर्भयता, नम्रता आणि सत्कर्म यांनाही विशेष महत्त्व आहे.

'काळ' हा शब्द केवळ वेळ दर्शवत नाही, तर जीवनातील कर्माचा अटळ नियमदेखील दर्शवतो. काळ कोणासाठीही थांबत नाही. राजा असो किंवा सामान्य मनुष्य, श्रीमंत असो किंवा गरीब, सामर्थ्यवान असो किंवा दुर्बलकाळाच्या प्रवाहापुढे प्रत्येकाला नतमस्तक व्हावे लागते. काळभैरवांचे स्वरूप आपल्याला याच सत्याची जाणीव करून देते की, जीवनातील प्रत्येक क्षण मौल्यवान आहे आणि प्रत्येक कर्माला त्याचा परिणाम असतो. मनुष्याने आपल्या कृतींची जबाबदारी स्वीकारून धर्माच्या मार्गावर चालावे, हा काळभैरवांच्या उपासनेतील अत्यंत महत्त्वाचा संदेश आहे. वेळेचा आदर करणे, चुकीच्या मार्गापासून दूर राहणे आणि आपल्या कर्मांविषयी सजग राहणे म्हणजेच काळभैरवांच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार होय.



काळभैरवांच्या हातातील त्रिशूळ त्यांच्या दिव्य सामर्थ्याचे प्रतीक मानले जाते. त्यांच्या रौद्र स्वरूपातही एक विलक्षण तेज आणि आध्यात्मिक संरक्षणाची भावना जाणवते. भक्तासाठी काळभैरवांचे उग्र रूप भय निर्माण करणारे नसून भयाचा नाश करणारे आहे. जीवनात संकटे आली, अडचणी निर्माण झाल्या किंवा मनामध्ये भीती निर्माण झाली, तरी त्यातून पळून जाण्याऐवजी धैर्याने परिस्थितीचा सामना करण्याची प्रेरणा काळभैरवांची भक्ती देते. ज्याच्या अंत:करणात श्रद्धा, सत्य आणि धर्म आहे, त्याच्या मनातील भीती हळूहळू धैर्यात रूपांतरित होते, अशी भक्तांची श्रद्धा आहे. म्हणूनच काळभैरव हे केवळ रौद्र देवता नसून भक्ताच्या मनाला निर्भय करणारे दैवी शक्तिस्वरूप आहेत.

काळभैरवांच्या प्रतिमेमध्ये त्यांच्या सोबत असलेला काळा श्वान विशेष महत्त्वाचा मानला जातो. काळा श्वान हा त्यांच्या रक्षक आणि क्षेत्रपाल स्वरूपाशी जोडला जातो. अनेक भक्त काळभैरवाच्या उपासनेत श्वानाला अन्न देण्याची परंपरा श्रद्धेने पाळतात. या कृतीमध्ये भक्तीबरोबरच जीवमात्रांप्रती दया, करुणा आणि सेवाभावाची भावनाही दिसून येते. काळभैरव आपल्याला शिकवतात की खरी आध्यात्मिकता केवळ मंदिरातील पूजा किंवा मंत्रजपात नसून आपल्या आचरणात, सेवेत आणि सर्व जीवांप्रती असलेल्या करुणेतही असते.

काळभैरवांचे आणखी एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे अहंकाराचा संहार. माणसाला संपत्ती, सत्ता, पद, सौंदर्य, प्रतिष्ठा किंवा सामर्थ्य मिळाले की त्याच्या मनात अहंकार निर्माण होण्याची शक्यता असते. परंतु काळाच्या प्रवाहात या सर्व गोष्टी क्षणभंगुर आहेत. आज ज्याच्याकडे सत्ता आहे, उद्या ती दुसऱ्याच्या हातात असू शकते; आज ज्याची प्रतिष्ठा आहे, ती उद्या नष्ट होऊ शकते. शरीर, संपत्ती आणि मान-सन्मान यांचा अभिमान करण्याऐवजी मनुष्याने नम्रता आणि सत्कर्माचा मार्ग स्वीकारावा, हा काळभैरवांच्या स्वरूपातून मिळणारा गहन संदेश आहे. कारण काळापेक्षा मोठी सत्ता कोणाचीही नाही आणि कर्माच्या परिणामापासून कोणीही सुटू शकत नाही.

काळभैरवांची भक्ती म्हणजे केवळ पूजा, मंत्रजप किंवा दर्शन एवढ्यापुरती मर्यादित नाही. त्यांच्या उपासनेचा खरा अर्थ आपल्या जीवनात दिसून यायला हवा. जिथे अन्याय आहे तिथे न्यायासाठी उभे राहणे, जिथे भीती आहे तिथे धैर्य निर्माण करणे, जिथे अज्ञान आहे तिथे ज्ञानाचा प्रकाश पसरवणे, जिथे अहंकार आहे तिथे नम्रता स्वीकारणे आणि जिथे नकारात्मकता आहे तिथे सकारात्मकतेचा मार्ग निवडणेहीच काळभैरवांच्या उपासनेची खरी दिशा आहे. त्यांच्या चरणी श्रद्धेने नतमस्तक होणे म्हणजे स्वत:मधील भीती, अहंकार आणि अज्ञानाचा त्याग करून सत्य आणि धर्माच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करणे होय. काळभैरव बाबा हे विनाशाचे नव्हे, तर अधर्माचा विनाश करून धर्माचे रक्षण करणाऱ्या महाशक्तीचे प्रतीक आहेत. त्यांचे रौद्र रूप आपल्याला घाबरवण्यासाठी नसून आपल्या अंतर्मनातील भयाचा नाश करण्यासाठी आहे. त्यांच्या कृपेची खरी अनुभूती संकटे कधीच येणार नाहीत यात नसून, संकटे आली तरी त्यांचा सामना करण्याचे धैर्य, विवेक आणि आत्मविश्वास मिळण्यात आहे. म्हणूनच काळभैरवांच्या चरणी श्रद्धेने नतमस्तक होताना मनामध्ये एकच विश्वास जागृत होतो "भय कसले, जेव्हा माझ्या रक्षणासाठी स्वयं महाकालांचे भैरवरूप उभे आहे!" काळभैरवांची भक्ती आपल्याला सत्य, धर्म, शिस्त, संयम, नम्रता आणि सत्कर्माचा मार्ग दाखवत राहो, हीच त्यांच्या चरणी प्रार्थना.

**ॐ कालभैरवाय नम:।**
**जय श्री काळभैरव बाबा!**
**हर हर महादेव!**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**